# : योजनेबाबत मार्गदर्शक सूचना :

❖ **विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थी पात्रतेकरीता कुंटुंबाची उत्पन्न मर्यादा किती असते ?**

विशेष सहाय्य योजने अंतर्गत योजना निहाय पात्रतेकरीता कुंटुंबाची उत्पन्न मर्यादा पुढील प्रमाणे असते.

| योजना | उत्पन्न मर्यादा |
|---|---|
| १. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन | दारिद्र्य रेषेखालील कुंटुंबाच्या यादीतील कुटुंब किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २१,०००/- पर्यंत |
| २. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट कुटुंब |
| ३. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट कुटुंब |
| ४. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट कुटुंब |

❖ **विशेष सहाय्य योजनेचे पात्रतेकरीता वयोमर्यादा काय आहेत ?**

विशेष सहाय्य योजनेची पात्रतेकरीता वयोमर्यादा योजनेनिहाय पुढील प्रमाणे आहेत.

| योजना | वयोमर्यादा |
|---|---|
| १. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना | ६५ व ६५ वर्षावरील |
| २. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना | ६५ व ६५ वर्षावरील |
| ३. इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना | ४० ते ६५ वर्षाच्या विधवा |
| ४. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना | १८ ते ६५ वर्षाचे अपंग |

❖ **विशेष सहाय्य योजने करीता अर्ज कोणाकडे करावा ?**

अर्जदाराने तो राहात असलेल्या भागातील संबंधित तलाठीकडे किंवा नायब तहसिलदार (सं.गा.यो.) यांचे कडे अर्ज करावा.

**श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेकरीता कोणकोणती कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

| योजना | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|
| १. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना | १. वयाचा पुरावा/दाखला २. उत्पन्नाचा दाखला<br>३. रहिवाशी दाखला |
| २. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना | १. वयाचा दाखला २. उत्पन्नाचा दाखला ३. रहिवाशी दाखला |
| ३. इंदिरा गांधी विधवा निवृत्तीवेतन योजना | १. वयाचा दाखला २. उत्पन्नाचा दाखला<br>३. रहिवासी दाखला ४. पतीचे निधन झाल्याबाबत ग्रामपंचायत/नगर परिषद/महानगरपालिका मृत्यू नोंदवहितील उतारा. |
| ४. इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना | १. अपंगात्वाचे प्रमाणपत्र २. वयाचा पुरावा/दाखला<br>३. उत्पन्नाचा दाखला ४. रहिवासी दाखला |